N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

PDF Compressor Free Version

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): चंद्रपुर **P.S.**(ठाणे): सिंदेवाही

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0181 **Year** (वर्ष): 2024

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 08/04/2024 22:26

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): दरमियानी दिन

**Time Period** (कालावधी):

**Date From** (दिनांक पासून): 03/04/2024

**Date To** ( दिनांक पर्यंत): 08/04/2024

**Time From** (वेळेपासून): 10:00 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 12:47 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 08/04/2024 **Time** (वेळ): 20:30 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 022

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 08/04/2024 22:26 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): Oral

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

पश्चिम, 01 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): महाकाली वार्ड सिंदेवाही ,सिंदेवाही , 441222

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

PDF Compressor Free Version

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): श्रीमती अल्का विष्णुदास कुभरे

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1979

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गिरगाव ,नागभीड,तळोधी,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गिरगाव ,नागभीड,तळोधी,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9765718279

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मधुकर मोतीराम मोहुर्ले | | | 1. गिरगाव ,नागभीड ,तळोधी, चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सौ. मंगला मधुकर मोहुर्ले | | | 1. गिरगाव ,नागभीड ,तळोधी, चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | मोतीराम सखाराम मोहुर्ले | | | 1. गिरगाव ,नागभीड ,तळोधी, चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

PDF Compressor Free Version

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | ध्वनी उपकरणे | सॅनडिक्स अल्ट्रा कंपनीचे 3 मेमोरी कार्ड | 0.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रू. दराच्या चलनी 100 नोटा(50000) तसेच डमी नोंटा 500 च्या 200नोटा | 150,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

150,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक: 08/04/2024 मी अल्का विष्णुदास कुंभरे , वय 42 वर्ष, धंदा-घरकाम/शेतमजुरी, रा. गिरगांव, पो. गिरगांव, ता. नागभिड, जि. चंद्रपूर. दिनांक 03/04/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर येथे येवुन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी आपले परीवारासह राहत असुन घरकाम व शेतमजुरीचे काम करतो. मला दोन मुले असुन मुलगा नामे तुषार विष्णुदास कुंभरे, 22 वर्ष शिक्षण-12 वी व मुलगी मैथीली विष्णुदास कुंभरे, वय 23 वर्ष, शिक्षण-पदवी असे आहे. माझे पती नामे विष्णुदास बाबुराव कुंभरे हे कर्करोग आजाराने दिनांक 07/12/2010 रोजी मरण पावले असुन ते महात्मा ज्योतीबा फुले शिक्षण मंडळ, गिरगाव, ता. नागभिड द्वारा संचालित सावित्रीबाई फुले विद्यालय तथा कला कनिष्ठ महाविद्यालय गिरगांव येथे शिपाई या पदावर नौकरीस होते. सदर विद्यालय सरकारमान्य असल्यामुळे मला मासीक पेन्शन मिळते. सन 2022 मध्ये महात्मा ज्योतीबा फुले शिक्षण मंडळ, गिरगाव, ता. नागभिड द्वारा संचालित सावित्रीबाई फुले विद्यालय तथा कला कनिष्ठ महाविद्यालय गिरगांव या शाळेची अनुकंपा नौकर भरती जाहीरात निघालेली होती. मी जाहीरात बघीतली व सावित्रीबाई फुले विद्यालय गिरगांव येथील शाळेचे मुख्याध्यापक यांना भेटले व माझे पती मृत्यु पावल्याने शाळेतील त्यांचे रिक्त जागेवर माझी अनुकंपावर नौकरीवर घेण्यात यावे याबाबत अर्ज केला होता. त्या अर्जावर शाळेचे मुख्याध्यापक यांनी मला म्हटले की, शाळेमध्ये जागा शिल्लक नाही आहे व नियमामध्ये बसत नसल्याचे सांगुन तुम्ही शाळेचे अध्यक्ष श्री. मोतीराम मोहुर्ले यांना भेटा असे सांगीतले. त्यांनतर मी महात्मा ज्योतीबा फुले शिक्षण मंडळ, गिरगाव, ता. नागभिड द्वारा संचालित सावित्रीबाई फुले विद्यालय तथा कला कनिष्ठ महाविद्यालय गिरगांव शाळेच्या संस्थेचे अध्यक्ष श्री. मोतीराम मोहुर्ले यांचेकडे गेले आणि त्यांना सांगीतले की, सर, आपले शाळेची नौकर भरती जाहीरात निघालेली आहे. त्यावर अध्यक्ष यांनी मला अध्यक्ष/सचिव यांचे नावाने अर्ज व मुख्याध्यापक यांचे नावाने एक अर्ज करण्यास सांगीतले. त्यावरुन मी वरील शाळेचे अध्यक्ष/सचिव यांचे नावाने व मुख्याध्यापक यांचे नावाने माझी या शाळेवर अनुकंपा तत्वावर नेमणुक होणेबाबत अर्ज केला होता. परंतु काही दिवसांनी मी विचार केला की, माझा मुलगा तुषार हा मोठा झाला असुन आपण अनुकंपा तत्वावर नौकरी करण्याऐवजी आपल्या मुलाला अनुकंपा तत्वावर नौकरीवर लावण्याचा मी निर्णय घेतला. त्यानंतर मी सदर शाळेचे अध्यक्ष/सचिव, मुख्याध्यापक यांना सदरची बाब सांगीतली आणि त्यांनी मला तुम्ही तुमचे नावानी दिलेला अर्ज मागे घ्या व तुमचा मुलगा तुषार कुंभरे याचे नावाने अनुकंपा तत्वार नौकरी मिळणेबाबतचा अर्ज करा असे सांगीतले. त्यावरुन सदर जाहीरातीनुसार माझा मुलगा नामे तुशार विष्णुदास कुंभरे याने महात्मा ज्योतीबा फुले शिक्षण मंडळ, गिरगाव, ता. नागभिड द्वारा संचालित सावित्रीबाई फुले विद्यालय तथा कला कनिष्ठ महाविद्यालय गिरगांव येथे अनुकंपातून शिपाई या पदाकरीता अर्ज केला होता. त्यानतर मार्च 2023 मध्ये मी शाळेच्या संस्थेचे अध्यक्ष श्री. मोतीराम मोहुर्ले यांचेकडे जावून माझा मुलगा तुषार याने अनुकंपा तत्वावर शिपाई या पदाकरीता केलेल्या अर्जाबाबत विचारपूस केली. परंतु ते माझ्या मुलाला भरती करून घेत नव्हते. काही दिवसानंतर परत मी संस्था अध्यक्ष श्री. मोतीराम मोहुर्ले यांना पुन्हा भेटून मुलगा तुषार कुमरे यास माझे पतीच्या जागेवर जॉईनींग करून घेण्याबाबत बोलले असता त्यांनी माझा मुलगा सचिव श्री. मधुकर मोतीराम मोहुर्ले यांना मी संस्थेचे सर्व अधिकार दिले असुन तुम्ही त्यांना भेटून घ्या आणि सचिव म्हणतील त्याप्रमाणे त्यांना

PDF Compressor Free Version

पैशाची व्यवस्था करुन द्या असे म्हणाले. त्यामुळे मी सचिव श्री. मधुकर मोतीराम मोहुर्ले यांना भेटले असता त्यांनी तुमच्या मुलाला जाईनिंग करुन घ्यावयाचे असल्यास मला दोन लाख रुपये द्यावे लागेल तरच मी तुमच्या मुलाला जॉईनिंग करुन घेईल असे म्हणाले. त्यानंतर मी दिनांक 13/03/2023 रोजी समृध्दी महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. गिरगाव येथील माझे नावाचे असलेले सेव्हींग ठेव खाते क्रमांक 255 मधुन एक लाख रुपये काढले व नाईलाजास्तव मी सचिव श्री. मधुकर मोतीराम मोहुर्ले यांना त्यांचे घरी जावून दिनांक 14/03/2023 रोजी एक लाख रुपये दिले होते. त्यावेळी माझे सोबत माझी मैत्रीन अस्मीता जगदीश बोरकर व तीचे पती जगदीश बोरकर हे सोबत होते. त्यानंतर सन 2022 मधील महात्मा ज्योतीबा फुले शिक्षण मंडळ, गिरगाव, ता. नागभिड द्वारा संचालित सावित्रीबाई फुले विद्यालय तथा कला कनिष्ठ महाविद्यालय गिरगांव या शाळेची अनुकंपा नौकर भरती प्रक्रीयेमध्ये माझा मुलगा तुषार कुंभरे यांने अनुकंप तत्वावर निवड करणेबाबत केलेल्या अर्जावरुन त्याची अनुकंपा तत्वावर शिपाई सेवक या पदावर निवड होऊन दि. 02/03/2023 रोजी त्यास सदर शाळेवर जॉईनिंग करुन घेतले होते. दिनांक 24/03/2024 रोजी माझ्या मुलाचे फोन क्र. 7620433807 यावर महात्मा ज्योतीबा फुले शिक्षण मंडळ, गिरगाव, ता. नागभिड द्वारा संचालित सावित्रीबाई फुले विद्यालय तथा कला कनिष्ठ महाविद्यालय गिरगांव या शाळेचे सचिव श्री. मधुकर मोहुर्ले यांनी त्यांचे मो.क्र. 9356335613 यावरुन फोन करुन म्हणाले की, तुझ्या आईला सिंदेवाही येथे माझ्या घरी घेऊन ये असे म्हणाले. त्यावरुन माझ्या मुलाने सदरची बाब मला सांगीतली. त्यानंतर मी दिनांक 31/03/2024 रोजी माझा मुलगा तुषार याला घेवुन सावित्रीबाई फुले विद्यालय गिरगांव या शाळेचे सचिव मधुकर मोतीराम मोहुर्ले यांचे सिंदेवाही येथील राहते घरी गेली. तेव्हा सचिव श्री. मधुकर मोहुर्ले हे त्यांचे घरी हजर होते. तेव्हा "सचिव श्री. मधुकर मोहुर्ले यांनी मला तुमच्या मुलाचा सध्या प्रोबेषन कालावधी सुरु आहे. हा कालावधी तीन वर्षाचा आहे. तुमचा मुलाचा आमच्याशाळेतील प्रोबेषन कालावधी पूर्ण होण्यापूर्वी मला बारा लाख रुपये द्या. अन्यथा मी तुमच्या मुलाचा अहवाल पाठवून नौकरीवरुन काढुन टाकीन असे म्हणाले. त्यावर मी त्यांना म्हटले की, "सर माझेकडे येवढे पैसे नाहीत, मी कुटून आणु येवढे बारा लाख रुपये आणि माझ्या मुलाला तुम्ही नौकरी वरुन काढू नका असे म्हणाली". तेव्हा सचिव मधुकर मोहुर्ले यांनी मला म्हटले की, "बारा लाख रुपये तुम्हाला द्यावेच लागतील". तेव्हा तुम्ही कर्ज काढा कींवा काहीही करा, पण तुम्ही मला बारा लाख रुपये दिले तरच मी तुमच्या मुलगा तुषार याला शाळेवरुन काढून टाकणार नाही व त्याला आमच्या षाळेवर षिपाई पदावर कायमस्वरुपी करुन टाकील. जर तुम्ही मला बारा लाख रुपये दिले नाही, तर तुमचा मुलगा तुशार कुंभरे यास मि षाळेवरुन कायमस्वरुपी काढून टाकील असे सचिव श्री. मधुकर मोहुर्ले यांनी म्हणाले असता मी सचिव श्री. मधुकर मोतीराम मोहुर्ले यांना नाईलाजास्तव होकार देऊन त्यांच्या घरुन निघुन आली. त्यानंतर मी दि. 01/04/2024 रोजी सायंकाळी 05/00 वा. चे दरम्यान सावित्रीबाई फुले विद्यालय गिरगांव या शाळेच्या संस्थेचे अध्यक्ष श्री. मोतीराम मोहुर्ले यांना मौजा गिरगांव येथे त्यांचे घरी जावुन भेटून "संस्थेचे सचिव श्री. मधुकर मोहुर्ले हे माझ्या मुलाला शाळेवर कायमस्वरुपी नौकरीवर ठेवण्याकरीता 12 लाख रुपये मागीत असुन पैसे नाही दिल्यास माझा मुलगा तुषार कुंभरे यास नोकरीवरुन काढुन टाकेल" असे म्हणाले असल्याचे सांगीतले. त्यावर अध्यक्ष श्री. मोतीराम मोहुर्ले यांनी "मी नाहीपुरता अध्यक्ष असुन माझे सर्व अधिकार माझा मुलगा मधुकर मोतीराम मोहुर्ले यास दिले असुन तो मागीत असलेले पैसे त्यास देऊन दे." असे म्हणाले. मला सावित्रीबाई फुले विद्यालय गिरगांव येथील सचिव श्री. मधुकर मोहुर्ले व अध्यक्ष श्री. मोतीराम मोहुर्ले यांना बारा लाख रुपये लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी आज रोजी 10:00 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपुर येथे येवुन सदरची तक्रार तुम्हाला देत आहे. तरी महात्मा ज्योतीबा फुले षिक्षण मंडळ, गिरगाव, ता. नागभिड द्वारा संचालित सावित्रीबाई फुले विद्यालय तथा कला कनिश्ठ महाविद्यालय गिरगांव येथील सचिव श्री. मधुकर मोतीराम मोहुर्ले व अध्यक्ष श्री. मोतीराम मोहुर्ले हे माझा मुलगा तुषार विष्णुदास कुंभरे यास सावित्रीबाई फुले विद्यालय गिरगांव या शाळेवर शिपाई या पदावर कायमस्वरुपी नौकरीवर करावयाचे कामासाठी 12,00,000/- रुपये लाचेची मागणी करीत असुन त्यांचेविरुध्द कार्यवाही होणेस विनंती आहे. माझा महात्मा ज्योतीबा फुले षिक्षण मंडळ, गिरगाव, ता. नागभिड द्वारा संचालित सावित्रीबाई फुले विद्यालय तथा कला कनिश्ठ महाविद्यालय गिरगांव येथील सचिव श्री. मधुकर मोतीराम मोहुर्ले व अध्यक्ष श्री. मोतीराम मोहुर्ले यांचेषी कोणताही आर्थिक व उसनवारीचा व्यवहार नाही. माझेकडे लाच रक्कमेत देण्याकरीता 12,00,000/-रु. उपलब्ध नसल्याने मी कार्यवाहीकरीता माझे वैयक्तीक बचतीतुन 50,000 /-रु. नगदी जमा केले व उर्वरीत रक्कम लहान मुलांच्या खेळणीतील नकली नोटा आपणाकडे लाच रक्कम म्हणुन वापरण्याकरीता देत आहे. अष्या आषयाची लेखी तक्रार दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. पाटील साहेब यांनी त्यांचे कार्यालयात हजर असलेल्या स्टाफची ओळख करुन देऊन पो.कॉ. अमोल सिडाम यांना सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय चंद्रपूर येथुन दोन पंच घेवुन येण्याबाबत मा. सहायक आयुक्त,मत्स्यव्यवसाय चंद्रपूर यांचे नावे पत्र दिले. पो.कॉ. अमोल सिडाम यांनी सहायक आयुक्त,मत्स्यव्यवसाय चंद्रपूर येथुन दोन पंच आणल्यानंतर पोलीस

PDF Compressor Free Version

निरीक्षक श्री. पाटील साहेब यांनी दोन्ही पंचाना स्टाफची ओळख करुन देउन त्यांची व माझी एकमेकांना ओळख करुन दिली. श्री. पाटील साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात माझे तक्रारीबाबत हकिकत सांगुन माझ्या सहीची लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या लेखी तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर श्री. पाटील साहेब यांनी सुद्धा स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. पाटील साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरुन पो. का. वैभव गाडगे यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर कश्याप्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक पाटील साहेब यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी कार्यवाही ही मौजा सिंदेवाही येथे जावुन करण्यात येणार असल्याचे सांगीतले. सदर पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरद्वारे रेकाॅर्ड करण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक पाटील साहेब यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 50,000/- रू. नगदी (500/- दराच्या 100 चलनी नोटा) घेवुन त्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. तसेच उर्वरीत 11,50,000/- रू. माझेकडे जुळत नसल्याने पोलीस निरीक्षक पाटील साहेब यांचे सुचनेनुसार लहान मुलांचे खेळणीतील नकली 500 रु. दाराचे नोटा एकुण 11,50,000/- बाजारातुन खरेदी करुन पोलीस निरीक्षक पाटील साहेब यांचेकडे जमा केले आहे. त्यानंतर सदरच्या नोटांना अॅन्थ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करुन दाखविले. तदनंतर लाचेच्या रक्कमेस अॅन्थ्रॅसिन पावडर लावली. लाच रक्कम असलेला लिफाफा पाटील साहेब यांनी त्यांचे ताब्यात ठेवला. (याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र 01 मध्ये घेण्यात आल्या). त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. पाटील साहेब यांनी मला "गैरअर्जदार सचिव श्री. मधुकर मोतीराम मोहुर्ले व गैअर्जदार अध्यक्ष श्री. मोतीराम मोहुर्ले हे कुठे मिळतील असे विचारले असता मी त्यांना सांगितले कि, "गैरअर्जदार सचिव श्री. मधुकर मोतीराम मोहुर्ले हे मौजा सिंदेवाही येथे त्यांचे राहते घरी व गैअर्जदार अध्यक्ष श्री. मोतीराम मोहुर्ले हे मौजा गिरगाव येथे त्यांचे राहते घरी हजर असल्याचे सांगीतले. त्यानंतर पुढील कार्यवाही मौजा सिंदेवाही परिसरात जावुन करावयाचे असल्याबाबत सांगुन अंदाजे 13/10 वा. (टिप CCTNS प्रणाली मध्ये शब्द मर्यादा कमी असल्यामुळे उर्वरीत फिर्याद मुळ फिर्याद मध्ये सलग्न करण्यात येत आहे.)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

tushar amarsing chavan(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिकाऱ्याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

PDF Compressor Free Version

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

श्रीमती अ. व्ही. कुंभरे

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): tushar amarsing cha
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.):

ठाणे अमलदार
पो. स्टे. [illegible]
जिल्हा. [illegible]

PDF Compressor Free Version



Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)